**<u>नियमित फौजदारी खटला क्र.०५/२०२३</u>**
**<u>उमाकांत वि. महेश व ईतर</u>**

-:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::-

फिर्यादी आणि त्यांचे अधिवक्ता गैरहजर आहेत. त्यांनी अर्ज नि.४५ वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम भरलेली नाही. तसेच फौजदारी शिरस्तेदार यांनी प्रकरण दोषारोप निश्चितीकरिता लावणे आवश्यक असताना रोजनाम्यामध्ये जबाब आणि म्हणण्याकरिता प्रकरण ठेवलेले आहे. सबब संबंधितांनी सुध्दा रोजनाम्यातील स्टेज दुरुस्ती करावी आणि प्रकरण दोषारोप निश्चितीकरिता लावण्यात यावे.

०२. त्याचप्रमाणे सदर प्रकरण हे आरोपी क्र.१ ते ३ यांच्याविरुध्द दोषारोप नोंदविण्याकरिता आहे. परंतु आजरोजी आरोपी गैरहजर आहेत. सबब आरोपींनी पुढील तारखेला न चुकता हजर रहावे.

०३. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.05.25 18:01:09 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**
**दिनांक – २५–०५–२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**देवणी.**